महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१८

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्यातील इमू पालन करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत

(१) ३७२५ (२२-१२-२०१४). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांनी इमूपालन सुरु केले असून शासनाने या व्यवसायास नाबार्ड सारख्या वित्तीय संस्थांकडून कर्ज व अनुदान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय सहाय मिळत असलेल्या शेतकऱ्यांनी इमू पालन व्यवसाय सुरु केला परंतु त्यांच्या अंडे व मांस यास मागणी नसल्याने सदरहू शेतकरी कर्जबाजारी झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जबाजारी इमू व्यावसायकांनी त्यांचे कर्ज शासनाने माफ करावे अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने कर्ज माफ करण्याबाबत काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१३-०८-२०१८) : (१) होय.

(२) हे खरे आहे.

(३) होय.

(४) शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंदर्भात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत दिनांक ९/५/२०१७ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १/४/२००१ ते दिनांक ३१/३/२०१६ पर्यंत इमूपालन, शेडनेट, पॉलीहाऊस यासाठी मध्यम मुदत कर्ज घेतलेल्या व अशा कर्जापैकी दिनांक ३०/६/२०१६ रोजी थकीत झालेल्या रकमेतून परतफेड केलेली रक्कम वगळून दिनांक ३१/७/२०१७ पर्यंतची मुद्दल व व्याजासह परतफेड न झालेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांचे अल्प / अत्यल्प भूधारक याप्रकारे जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता योजनेच्या पूर्वीच्या निकषाप्रमाणे सरसकट प्रति कुटुंब रु.१.५० लाखापर्यंत कर्जमाफी देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठीच्या दुष्काळी पॅकेजमध्ये इमू प्रकल्पात नुकसान झालेल्या शेतक-यांना मदत जाहिर करण्यात आली नसल्याबाबत

(२) ८०२४ (०४-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी जाहीर झालेल्या दुष्काळी पॅकेजमध्ये इमू प्रकल्पात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत जाहीर करण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामध्ये महिला बचतगटही असल्याने त्यांनाही आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार इमू प्रकल्पात आर्थिक नुकसान झालेल्या शेतक-यांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१३-०८-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ३२ इमू व्यावसायिकांकडे रुपये ८४.२० लाख थकबाकी आहे.

(४) शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंदर्भात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत दिनांक ९/५/२०१७ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १/४/२००१ ते दिनांक ३१/३/२०१६ पर्यंत इमूपालन, शेडनेट, पॉलीहाऊस यासाठी मध्यम मुदत कर्ज घेतलेल्या व अशा कर्जापैकी दिनांक ३०/६/२०१६ रोजी थकीत झालेल्या रकमेतून परतफेड केलेली रक्कम वगळून दिनांक ३१/७/२०१७ पर्यंतची मुद्दल व व्याजासह परतफेड न झालेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांचे अल्प / अत्यल्प भूधारक याप्रकारे जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता योजनेच्या पूर्वीच्या निकषाप्रमाणे सरसकट प्रति कुटुंब रु.१.५० लाखपर्यंत कर्जमाफी देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

आंबिवली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण देण्यात येत असल्याबाबत

(३) ८४३० (०९-०४-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबिवली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील आदिवासी आश्रमशाळेत इमारत नसल्यामुळे ही आश्रमशाळा पोल्ट्री फार्ममध्ये सुरु करण्यात आली असून तेथील मुलांना निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच टाकीपठार (ता.शहापूर, जि.ठाणे) आश्रमशाळेची इमारत मोडकळीस आली असून शाळेच्या परिसरातच मोकाट गुरांचा वावर असून मुलांना गुरांसोबतच रहावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आश्रमशाळेत ४८४ मुले/मुली राहात असतानाही त्यांना शौचालय, आंघोळीसाठी विहीरीवर जावे लागत असल्याचे तसेच निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जात असल्याची बाब दिनांक १४ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, त्यानुसार कोट्यवधी रुपये खर्च करुन सुरु करण्यात आलेल्या राज्यातील आश्रमशाळांची दुरावस्था दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१३-०८-२०१८) : (१) श्रीमती. संजना संभाजी धिर्डे व श्रीमती मेघा लक्ष्मण धिर्डे यांच्या मालकीचे शेड्स शासकीय आश्रमशाळा, आंबिवलीसाठी भाडयाने घेण्यात आले आहेत. त्या शेड्सचे रूपांतर १० वर्ग खोल्या, कार्यालय, स्वयंपाकगृह व कोठीगृहामध्ये करण्यात आले आहे. तसेच मुलांसाठी ४ शौचालय व ४ स्नानगृहे असून मुलींसाठी ४ शौचालय व ४ स्नागगृहे उपलब्ध आहेत.

सदर आश्रमशाळा नवीन टाईप प्लॅननूसार बांधकामासाठी २ हेक्टर जागा प्राप्त झाली असून अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जात असल्याची बाब आढळून आलेली नाही.

(२), (३) व (४) सदर शाळेसाठी शालेय इमारत व वर्ग ४ कर्मचारी निवासस्थाने यांची बांधकामे पूर्ण झाली असून सदर इमारतचा ताबा घेण्यात आला आहे. तसेच मुलां/मुलींचे वसतिगृह इमारत, मुख्याध्यापक, अधीक्षक व शिक्षक निवासस्थान बांधकामांसाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच मुलांसाठी ८ शौचालय व ४ स्नानगृहे उपलब्ध असून मुलींसाठी ८ शौचालय व १४ स्नानगृहे उपलब्ध आहेत.

शासकीय आश्रमशाळेतील मुलां/मुलींना शौचालय व आंघोळीसाठी विहीरवर जावे लागत असल्याचे व निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जात असल्याची बाब आढळून आलेली नाही.

(५) व (६) राज्यातील सर्व आश्रमशाळांना नवीन टाईप प्लॅननूसार आर. सी. सी. इमारती बांधण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून शासकीय आश्रमशाळा इमारत बांधकाम व दुरूस्तीची कामे जलद गतीने होण्यासाठी विभागाने स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली आहे. सदर कक्षामार्फत शासकीय आश्रमशाळा इमारत बांधकामांची कामे जलद गतीने सुरू आहेत.

दौंड (जि.पुणे) येथे शासकीय वसतीगृह तसेच शासकीय निवासी शाळा सुरु करण्याबाबत

(४) २८२३९ (३१-१०-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) येथे शासकीय वसतीगृह बांधणेबाबत तसेच शासकीय निवासी शाळा सुरु करणेबाबत मा.सामाजिक न्याय मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१६-०८-२०१८) : (१) होय.

(२) शासन आदेश दि. २८.०२.२०१८ अन्वये दौंड (जि.पुणे) येथे शासकीय निवासी शाळा हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

माढा (जि.सोलापुर) येथील महावितरण कंपनीतील रिक्त पदे भरण्याबाबत

(५) ३५१७३ (२३-१२-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापुर) येथील महावितरण कंपनीतील रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी मा.उर्जा मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी दिनांक २८ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०८-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सोलापूर जिल्हयातील माढा विधानसभा मतदारसंघात महावितरण कंपनीचे माढा, कुर्डुवाडी व टेंभुर्णी असे असे तीन उपविभाग असून, सदर तीन उपविभागात एकूण २९७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १३६ पदे भरण्यात आली असून, १६१ पदे रिक्त आहेत. सदर १६१ रिक्त पदांपैकी १४३ पदे बाहयस्त्रोत पध्दतीने भरण्यात आली असून, निव्वळ रिक्त पदांची संख्या १८ इतकी आहे. रिक्त पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

रामटेक आदिवासी वसतीगृहातील मुलांना भोजन दिले जात नसल्याबाबत

(६) ४०२७८ (२९-०४-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक किट्स कॉलेज समोरील शासकीय आदिवासी वसतीगृहातील कंत्राटदाराने मागील १५ ते २० दिवसांपासून विद्यार्थ्यांना भोजन आणि नाश्त्यापासून वंचित ठेवले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदार श्री.निरज गुप्ता यांनी शासनाची मंजुरी न घेता दुसऱ्या कंत्राटदारास कंत्राट सोपविले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतीगृहातील विद्यार्थ्यांना नाश्ता व भोजन न मिळाल्याने त्यांनी आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास विद्यार्थ्यांना भोजन व नाश्ता न देणाऱ्या कंत्राटदार, वसतीगृह अधिक्षक यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१३-०८-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.

(३) वसतीगृहातील विद्यार्थ्यांना नाश्ता व भोजन वेळवर मिळत नसल्याने वसतीगृहातील विद्यार्थी एकत्रीत येऊन त्यांनी भोजन पुरवठाधारक यांचे विरुध्द आंदोलन करुन त्यांचेकडील भोजन/नाश्ता घेण्यास नकार दिला.

सदर भोजन/नाश्ता विद्यार्थ्यांनी नाकारल्याने त्वरीत स्थानिक भोजनपुरवठाधारक यांचे कडून विद्यार्थ्यांसाठी तात्पुरती भोजन व्यवस्था सुरु करण्यात आलेली आहे.

(४) गृहपाल, आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, रामटेक यांच्या दिनांक ४.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये भोजनाचा दर्जा सुधारणे आणि विदयार्थ्यांना वेळेवर भोजन/नाश्ता देणेबाबत भोजन ठेकेदारास सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच श्री.आर.टी.नन्नावरे, वसतीगृह अधीक्षक यांच्या दोन वेतन वाढी तात्पुरत्या स्वरुपात थांबविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या रोजंदारीवर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना अत्यल्प वेतन दिले जात असल्याबाबत

(७) ४५२९७ (२७-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या रोजंदारीवर नियुक्त केलेल्या १०२ कर्मचाऱ्यांना केवळ अडीच हजार रुपये एवढ्या कमी वेतनावर काम करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच त्यांना सेवा शाश्वती नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बँकेतील कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१३-०८-२०१८) : (१) अंशत: खरे आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये सध्या ९९ कंत्राटी कर्मचारी शिपाई या पदावर काम करीत आहेत. सद्यस्थितीत सदर कर्मचाऱ्यांना दरमहा रु.२५००/- इतके वेतन अदा केले जाते. याबाबतीत बँक संचालक मंडळ ठराव नं.९, दि.३०/४/२०१६ अन्वये दि.०१/०५/२०१६ पासून सदर कर्मचाऱ्यांना दरमहा रु.१०,०००/- इतके वेतन देण्याचा निर्णय घेतला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) कामगार संघटनेने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वतीने बँकेच्या नोकरीत कायम करण्यासाठी मे.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर येथे यु.एल.पी. नं.२०८/२००९ दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल बँकेच्या विरुध्द गेल्यामुळे बँकेने मे.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांच्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन नं.५८४०/२०१३ दाखल केले आहे. सदर बाब न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी विद्यार्थ्यांना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती फॉर्म भरताना येणाऱ्या अडचणींबाबत

(८) ४८९५० (२९-०४-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती फॉर्म ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया सुरु केल्यानंतर सदर फॉर्म भरण्यास विद्यार्थ्यांना येणा-या अडचणींमुळे अनेक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरलेले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑनलाईन फॉर्म भरण्यास विद्यार्थ्यांना येणा-या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१३-०८-२०१८) : (१) सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजने अंतर्गत विकसीत केलेल्या ऑनलाईन संगणकीय प्रणालीमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यास तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या.
(२) व (३) सन २०१५-१६ व २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यासाठी आय.सी.आय.सी.आय. बँकेचे तांत्रिक सहाय्य घेऊन संकेतस्थळ तथा संगणक प्रणाली कार्यान्वीत केली आहे.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरीता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय) सुरु करण्याबाबत

(९) ५६९४३ (२०-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीची (एस.सी.) लोकसंख्या सुमारे एक कोटी ३२ लाख असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात लोकसंख्येनुसार एस.सी. विद्यार्थ्यांकरीता औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय) सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार कोणकोणत्या जिल्ह्यात आयटीआय स्थापन करण्यात येणार आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१३-०८-२०१८) :(१) अशा स्वरुपाची मागणी सन्माननीय लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केलेली आहे.

(२) सदर प्रस्तावावर कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विविध महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी बनावट जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्रे देऊन प्रवेश घेतल्याबाबत

(१०) ६५४६३ (१०-०१-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध नामांकित महाविद्यालयांमध्ये बनावट जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे किती विद्यार्थी आहेत व प्रवेश घेतलेली महाविद्यालये कोणती आहेत,

(३) तसेच मराठवाडयातील सुमारे दिड लाख बोगस जात आणि वैधता प्रमाणपत्रे वितरित केल्या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्यासाठी राज्य शासनाने औरंगाबाद विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी पथक दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास नेमले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी विशेष चौकशी पथकाने चौकशी करुन शासनास अहवाल सादर केला आहे काय, चौकशी अहवालाचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१३-०८-२०१८) : (१) होय.

(२) असे एकूण २८ विद्यार्थी असून महाविद्यालय निहाय तपशील पुढीलप्रमाणे :-

१. ग्रांट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई-१० विद्यार्थी

२. लोकमान्य टिळक म्युनिसिपल वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई- ०५ विद्यार्थी

३. सेठ जी.एस.वैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई- ०४ विद्यार्थी

४. एच.बी.टी.वैद्यकीय महाविद्यालय आणि कुपर रुग्णालय, मुंबई- ०१ विद्यार्थी

५. टोपीवाला नॅशनल वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई- ०२ विद्यार्थी

६. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर-०२ विद्यार्थी

७. नायर रुग्णालय व दंत महाविद्यालय, मुंबई- ०३ विद्यार्थी

८. शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई -०१ विद्यार्थी

(३) अंशतः खरे आहे.

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि.०१ जुलै,२०१६ अन्वये औरंगाबाद महसुली विभागात नामसाधर्म्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीची बोगस जात प्रमाणपत्रे, पडताळणी समितीची बनावट वैधता प्रमाणपत्रे प्राप्त करणे इत्यादीची सखोल तपासणी करण्यासाठी औरंगाबाद विभागीय महसूल आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली "विशेष तपासणी समिती" गठीत करण्यात आली आहे.

(४) सदर प्रकरणी गठीत विशेष तपासणी समितीस वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली असून सदर तपासणी समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाकडून राज्य शासनाला प्राप्त होणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत गैरव्यवहार झाल्याबाबत

(११) ६९३८८ (१०-०१-२०१७). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून राज्याला देण्यात येणाऱ्या दलित आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीपैकी सुमारे ३० ते ५० टक्के रक्कमेत संस्थाचालकांकडून अपहार झाल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१३-०८-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) राज्यात सामाजिक न्याय व अन्य विभागामार्फत देण्यात आलेल्या भारत सरकार शिष्यवृत्ती वाटपातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरीता गृह विभागामार्फत दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी विशेष चौकशी पथकाची (टास्क फोर्स) नियुक्ती करण्यात आली होती. विशेष चौकशी पथकाने या संदर्भातील चौकशी अहवाल मा.मुख्य सचिवांना सादर केला आहे. विशेष चौकशी पथकाच्या चौकशी अहवालाचे विश्लेषण व पडताळणी आयुक्त, समाजकल्याण यांचे स्तरावर सुरु असून विशेष चौकशी पथकाने दर्शविलेल्या अनियमिततेच्या रक्कमेपैकी वसुलपात्र रक्कमेच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कस्तुरबा कॉलेज ऑफ आर्टस कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, बल्लारशा (जि.चंद्रपूर) या संस्थेने शिष्यवृत्तीच्या रकमेत गैरव्यवहार केल्याबाबत

(१२) ७१२२१ (२७-०१-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कस्तुरबा कॉलेज ऑफ आर्टस कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, बल्लारशा (जि.चंद्रपूर) या महाविद्यालयाला शासनाची व विद्यापीठाची परवानगी नसताना समाजकल्याण विभाग चंद्रपूर, कार्यालयातून मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत गैरव्यवहार झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कस्तुरबा या नावाने महाविद्यालयाची परवानगी नसतांना कोणत्याही मुळ परवानगी पत्राची खात्री न करता शिष्यवृत्तीची रक्कम मंजुर करण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच, या संस्था चालकाने शिष्यवृत्तीमध्ये गैरप्रकार करुन आलेल्या पैशातून नागपूर येथील नारायणा स्कुल २०० कोटी रुपयात विकत घेतलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दोषी आढळून आलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१३-०८-२०१८) : (१) अंशत: होय
(२) सदर संस्थेला शासनाची मान्यता होती. तसेच संस्थेने कस्तुरबा कॉलेज ऑफ आर्ट, कॉमर्स ॲन्ड सायन्स, बल्लारपूर याच नावाने सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण चंद्रपूर या कार्यालयात प्रस्ताव सादर केल्याने व संस्थेला शासनाची मान्यता असल्याने तेच नाव ऑनलाईन शिष्यवृत्ती प्रणालीत समाविष्ट करुन त्याच नावाने शिष्यवृत्तीची देयके पारीत करण्यात आली.
(३) नाही, सदर महाविद्यालयास अतिरिक्त अदा झालेली रु.७९,८८,२४७/- इतकी रक्कम वसूल करुन शासन जमा करण्यात आलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

शाह छप्परबंद फकीर समाजाला जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत

(१३) ७५६९१ (२१-०४-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाह छप्परबंद फकीर समाजाला जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देणे संदर्भात दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मंत्रालय, मुंबई येथे बैठक आयोजित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.मंत्री महोदय यांनी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासन निर्णय काढण्याबाबत बैठकीमध्ये संबंधित अधिका-यांना आदेशित केले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१३-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

छप्परबंद (मुस्लीम धर्मियांसह) जातीच्या व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना शासन परिपत्रक दि.२३/०३/२०११ अन्वये निर्गमित करण्यात आल्या होत्या. तथापि, मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल याचिका क्रमांक २८०२/२०१४ मध्ये दि.०४/१२/२०१४ रोजी झालेल्या सुनावणीअंती मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयास अनुसुरून उक्त नमूद परिपत्रक दि.१६/०२/२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये रद्द करण्यात आलेले आहे.

जात प्रमाणपत्र देणे त्याच्या पडताळणीचे कामकाज हे सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३ तसेच त्या अंतर्गत तयार करण्यात आलेले नियम, २०१२ मधील तरतुदीनुसार तसेच मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार चालते.

यास्तव छप्परबंद (मुस्लीम धर्मियांसह) जातीच्या व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करतांना प्रकरणपरत्वे प्राप्त कागदपत्रे, पुरावे, आवश्यकतेनुसार पोलीस दक्षता पथकाकडून अहवाल घेऊन विहित तरतुदीनुसार संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडून उचित निर्णय घेतले जात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयातील जिल्हा निबंधक, उपनिबंधक व सहायक निबंधकांच्या आढावा बैठकीबाबत

(१४) ७७९३७ (२१-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील जिल्हा निबंधक, उपनिंबधक व सहायक निबंधकांची आढावा बैठक माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा च्या शेवटच्या आठवडयात घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आढावा बैठकीत कोणकोणत्या विषयावर चर्चा करण्यात आली आहे,

(३) असल्यास, यावेळी मा.सहकार मंत्री यांनी कोणकोणत्या सूचना, आदेश संबधित अधिकाऱ्यांना दिले,

(४) असल्यास, या आदेशांची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात येणार आहे ?

श्री. सुभाष देशमुख (०६-०८-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

(२) चर्चा करण्यात आलेले विषय पुढीलप्रमाणे -

i) पीक कर्जाचे वाटप (जिमस बँका व व्यापारी बँका)

ii) पीक कर्ज पुनर्गठन

iii) १००% खातेदारांना विकास संस्थांचे सभासदत्व देण्याबाबत

iv) सहकार क्षेत्रात नाविन्यपूर्ण सहकारी संस्थांचे सभासदत्व देण्याबाबत

v) अडचणीतील नागरी सहकारी बँकांच्या कामकाजाचा आढावा

vi) अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्थांच्या कामकाजाचा आढावा

vii) सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षण कामकाजाचा आढावा

viii) शासकीय वसूलीचा आढावा

ix) बेकायदेशीर सावकारी प्रकरणी कारवाईचा आढावा

x) सहकारी खरेदी विक्री संघाचे बळकटीकरण करणे

xi) शेतमाल तारण योजनेची अंमलबजावणी

xii) शेतकरी-ग्राहक बाजार उपक्रमाची अंमलबजावणी

(३) या बैठकीत खालीलप्रमाणे सूचना, आदेश दिले होते.

i) जिल्हा बँकेमार्फत वाटप केलेले कर्ज आणखी जास्त प्रमाणात शेतकऱ्यांना मिळावे यासाठी प्रयत्न करण्यास सांगितले.

ii) जिल्हा मध्यवर्ती बँकांचे पीक कर्ज वाटपामध्ये प्रमाण वाढणे आवश्यक असल्याबाबत सुचविले. तसेच प्रत्येक शेतकऱ्याने फक्त जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फतच कर्ज घ्यावे अशा दृष्टीने सर्व अधिकाऱ्यांनी प्रयत्न करण्याबाबत सांगितले.

iii) खाजगी व राष्ट्रीयकृत बँकांकडील सभासद वर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे कसा आकर्षित होईल त्या अनुषंगाने नियोजन करण्याबाबत सुचना दिल्या.

iv) जिजामाता को-ऑपरेटिव्ह हॉस्पिटल लि.कोल्हापूर, वसंतदादा सहकारी मका प्रक्रिया कारखाना लि.रांजणी ता.कवठे महांकाळ जि.सांगली, सिम्बायोसिस को-ऑप.फार्मास्युटिकल्स लि.सांगली, शिवसदन सहकारी सोसा. लि.सांगली, बावधन विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि.बावधन, ता.वाई इत्यादी संस्थांचा आढावा घेऊन प्रत्येक जिल्हा उपनिबंधक व सहाय्यक निबंधक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील संस्थांना अशाच प्रकारचे संस्थांसाठी अतिरीक्त उत्पन्न मिळवून देणारे उपक्रम राबविणेबाबत प्रोत्साहन करण्याबाबत सुचविले.

v) कर्जदारांकडून जास्तीत जास्त रक्कम वसूल करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना देऊन ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत करण्याबाबत सुचना दिल्या.

vi) कर्जदारांकडून जास्तीत जास्त रक्कम वसूल करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत तसेच ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत करणेबाबत सुचना दिल्या. तसेच जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने त्यांच्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त पतसंस्था अडचणीतून बाहेर काढण्याबाबत प्रयत्न करण्याच्या सुचना दिल्या.

vii) लेखापरिक्षण विभागाला लेखापरिक्षण वेळेत पूर्ण करून उर्वरित सर्व संस्थांचे लेखापरिक्षण पूर्ण करावे अशा सुचना दिल्या.

viii) शासकीय भागभांडवलाच्या वसूलीचे प्रमाण कमी दिसत असल्याने संबंधित जिल्हा उपनिबंधक यांना वसूलीच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत सुचविले.

ix) सावकारी कायद्यातील कलम १६ अन्वये तपासणी / झडती घेण्याची कार्यवाही प्रलंबित असलेल्या प्रकरणांची लवकरात लवकर तपासणी / झडती घेण्याबाबत सुचविले.

x) प्रत्येक खरेदी विक्री संघाने कराड खरेदी विक्री संघ करत असलेल्या हंगामी व्यवसायाप्रमाणे व्यवसाय करून उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न केला तर बंद स्थितीत असलेले किंवा बंद होण्याच्या मार्गावर किंवा तोट्यात असणारे खरेदी विक्री संघ पुन्हा सुस्थितीत किंवा फायद्यात येतील, असा विश्वास व्यक्त केला.

xi) शेतमाल तारण योजना जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी बाजार समित्यांनी योजनेची माहिती देणारे मोठे बॅनर बाजार समिती परिसरामध्ये लावण्याबाबत सुचना दिल्या.

xii) जास्तीत जास्त शेतकरी ते ग्राहक बाजार सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याबाबत सुचना दिल्या.

(४) संबंधित अधिकाऱ्यांना बैठकीअंती दिलेल्या सुचनांनुसार समयबध्द कार्यक्रम आखण्यात आला आहे व याबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर आढावा घेत आहेत.

नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव व अहमदनगर या विभागातील मागासवर्गीय विद्यार्थांचे शिष्यवृतीचे अर्ज महाविद्यालयीन स्तरावर प्रलंबित असल्याबाबत

(१५) ७८२३९ (०६-०५-२०१७). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव व अहमदनगर जिल्हयातील महाविद्यालयांचे सन २०१५-१६ वर्षांकरिता मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयीन स्तरावर प्रलंबित आहेत, हे खरे हे काय,

(२) असल्यास, वारंवार सूचित करूनही प्रलंबित अर्ज सहायक आयुक्तांकडे मंजुरीसाठी पाठविण्यास प्राचार्यांकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक व आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या प्राचार्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०२-०८-२०१८) : (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) सन २०१५-१६ या वर्षातील महाविद्यालय स्तरावर प्रलंबित शिष्यवृत्तीचे अर्ज निकाली काढण्याबाबतच्या सूचना संबंधित महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भिल्ल, डोंबारी, फासेपारधी व इतर तत्सम जातीच्या नागरिकांना जातीचे दाखले व जातपडताळणी प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत असल्याबाबत

(१६) ८०१३८ (२८-११-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिल्ल, डोंबारी, फासेपारधी व इतर तत्सम जातीच्या नागरिकांना जातीचे दाखले व जातपडताळणी करण्यासाठी १९६५ पूर्वीच्या जातीच्या पुराव्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जातीच्या पुराव्याच्या अटीमुळे ते त्या जातीचे असून देखील त्यांचे नैसर्गिक लाभ त्यांना मिळत नाहीत व त्यांच्या अनेक हक्कांपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अट रद्द करणे किंवा कमी करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०४-०८-२०१८) : (१), (२), (३) व (४) शासनाने, राज्यात "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन), अधिनियम २००० (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३) लागू केलेला आहे व त्या अंतर्गत महाराष्ट्र अनूसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन), नियम २००३" लागू केलेले आहेत.

उक्त नियम २००३ मधील तरतुदी प्रमाणे भिल्ल, फासेपारधी व इतर अनुसूचित जमातींना जातीचे दाखले व जात पडताळणी करण्यासाठी अशा अनुसूचित जमातीच्या अधिसुचनेच्या दिनांकापूर्वी (६ सप्टेंबर १९५०) अनुसूचित जमातीबाबत किंवा निवासाच्या सर्व साधारण ठिकाणाबाबतचा लेखी पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

उक्त अधिनियम २००० मधील कलम ८ नुसार अनुसूचित जमातीचा दावा सिध्द करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची असून दावा सिध्द करणाऱ्या व्यक्तीस जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळते व त्या अनुषंगाने त्यांना अनुसूचित जमातीचा लाभ अनुज्ञेय आहेत. विशिष्ट क्षेत्रातील अनुसूचित जमातीसाठी वेगळे नियम नाहीत.

डोंबारी ही जात भटक्या जमाती ब या प्रवर्गामधील अ.क्र.१५ वरील कोल्हाटी या जातीची तत्सम जात आहे. सामाजिक न्याय विभागाने सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३ नुसार महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन), नियम २०१२ विहित करण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सामाजिक न्याय विभागाच्या दि.०६.०२.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये विमुक्त जाती भटक्या जमाती या प्रवर्गातील व्यक्तींना अथवा त्यांच्या कुटुंबियांना दि.२१.११.१९६१ रोजी वा तत्पूर्वी त्यांच्या राज्यातील सर्वसाधारण रहिवास असण्याची अट विहित करण्यात आली असून त्यानुसार जात पडताळणी नियम २०१२ मध्ये सदर अटीचा समावेश करण्यात आला आहे. सदर नियमानुसार जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता आवश्यक ते जातीचे पुरावे,कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

राज्यातील थकित कर्जदारांवर कारवाई करण्याच्या शासनाच्या निर्णयाबाबत

(१७) ८६२५६ (१८-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय तसेच सहकारी बँकांकडून घेतलेल्या कर्जाचे हप्ते थकवून बँकांना आर्थिक दृष्ट्या अडचणीत आणणा-या राज्यातील कर्जदारांवर कारवाई करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने अंमलबजावणी सुरु झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील किती कर्जदारांवर कारवाई करण्यात आली आहे व कर्ज न फेडू शकणा-या किती कर्जदारांच्या मालमत्ता ठाणे जिल्हा प्रशासनाने जप्त केल्या आहेत,

(४) नसल्यास, याप्रकरणी वसूलीची कारवाई किती कालावधीत पुर्ण करण्यात येईल ?

श्री. सुभाष देशमुख (१३-०८-२०१८) : (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

देवगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्राची क्षमता वाढ करण्याबाबत

(१८) ९५७६४ (२९-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्राची क्षमता वाढ करण्यासाठी ५ एमव्हीए चा अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर बसविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच देवगाव-विंचूर ३३ केव्ही उच्च दाब वाहिनीचे सबलीकरण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) मधील मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०८-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर बाबतीत कानळद येथे पायाभूत आराखडा-२ अंतर्गत ३३/११ केव्ही १ X ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे उपकेंद्र मंजूर आहे. सदर उपकेंद्राची जागा दिनांक १८.०१.२०१८ रोजी ताब्यात घेण्यात आली असून निविदा प्रक्रिया सुरु आहे. ३३/११ केव्ही कानळद उपकेंद्र कार्यान्वित झाल्यावर उपकेंद्राचा विद्युत भार कमी होण्यास मदत होईल. तसेच देवगांव-विंचूर येथील ३३ के.व्ही. उच्च दाब वाहिनीचे सबलीकरण करण्याचे काम पूर्ण झाले असून सदरची वाहिनी दिनांक १२.०६.२०१७ रोजी कार्यान्वित झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता इगतपुरी (जि.नाशिक) येथील क्रीडा प्रबोधिनीचे काम सुरु करण्याबाबत

(१९) ९६३४२ (०१-०१-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता इगतपुरी (जि.नाशिक) येथे क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्याचा निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २००९ रोजी शासनाने घेवूनही माहे ऑक्टोंबर, २०१७ पर्यंत सदर प्रबोधिनीचे बांधकाम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रबोधिनीचा बांधकाम आराखडा व अंदाजपत्रकांना राज्य क्रीडा समितीने मान्यता देवूनही सदर कामे अद्याप सुरु झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुसूचित जमातीच्या मुलांच्या क्रीडा गुणांना चालना देणे व क्रीडा विषयक सोईसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उक्त क्रीडा प्रबोधिनीचे बांधकाम त्वरित सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१३-०८-२०१८) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) इगतपुरी (जि.नाशिक) येथे क्रीडा प्रबोधिनीच्या बांधकामासाठी चालू दरसुचीनुसार अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर सदर क्रीडा प्रबोधिनीचे बांधकाम सूरू करण्याच्या दृष्टीने निविदा प्रक्रीया सूरू करण्यात येणार आहे.

वस्त्रोद्योगातील पात्र उद्योग घटकांना देण्यात येणारे पाच टक्के अनुदान दिले नसल्याबाबत

(२०) ९७५८५ (१३-०७-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या वस्त्रोद्योग धोरण २००६-११ अंतर्गत वस्त्रोद्योगातील पात्र उद्योग घटकांना देण्यात येणारे पाच टक्के अनुदान दिले नसल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचे लेखी निवेदन मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २९ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या सुमारास यंत्रमाग धारकांनी दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने पात्र उद्योग घटकांचे प्रलंबित व्याज अनुदान तातडीने देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१३-०८-२०१८) : (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र राज्याचे वस्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत वस्रोद्योग प्रकल्पांना व्याज अनुदान या योजनेखाली निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान वितरीत करण्यात येते. निधीच्या अनुपलब्धतेमुळे मंजुरीप्राप्त वस्रोद्योग प्रकल्पांचे अनुदान वितरीत करण्याबाबत विविध वस्रोद्योगांचे अर्ज शासनास प्राप्त झालेले आहेत.

व्याज अनुदान या योजनेखाली जून, २०१८ अखेर रू. २८४.०५ कोटी व्याज अनुदानाच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या निधी रू. ८४.३५ कोटी पैकी ७० टक्के खर्चाच्या मर्यादेनुसार रू. ५९.०५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. या योजनेखाली निधीच्या उपलब्धतेनुसार वस्रोद्योग प्रकल्पांना अनुदान वितरीत करण्यात येईल.

केंद्र शासनाने राज्यासाठी ७५४० सौर कृषी पंपाचे उद्दीष्ट निश्चित केल्याबाबत

(२१) ९९८०१ (२९-१२-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने राष्ट्रीयस्तरावर १ लाख सौर कृषी पंपाच्या योजनेंतर्गत राज्यासाठी ७५४० सौर कृषी पंपाचे उद्दीष्ट निश्चित केले असून आर्थिक वर्ष २०१४-१५ मधील ३० टक्क्यांप्रमाणे १३३ कोटी ५० लाखांचे केंद्रीय अर्थसहाय्य राज्य शासनास सौर कृषी पंपासाठी देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सौर कृषी पंप योजनेची सद्यस्थिती काय आहे व योजनेचे निकष काय आहेत,

(३) असल्यास, सदर योजना ही महावितरण व महाउर्जा यांच्या समन्वयाने राबविण्यात येणार आहे व या योजनेच्या देखरेखीसाठी सुकाणू समिती नेमण्यात येणार असून याबाबतच्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०८-२०१८) : (१) हे अंशत: खरे आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २७ मार्च, २०१५ व दिनांक १४ जुन, २०१७ च्या अटल सौर कृषीपंप आस्थापित करण्याच्या एकत्रित धोरणाबाबतच्या शासन निर्णयांन्वये अनुक्रमे ७५४० व२४६० असे एकूण १०,००० नग सौर कृषी पंप राज्यात आस्थापित करण्याचा निर्णय घेतला हे खरे आहे. यापैकी केंद्रिय अनुदानातून३७२८ नग सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले असून त्याअनुषंगाने केंद्र हिश्यापोटी रू.३८ कोटी अर्थसहाय्य अनुज्ञेय ठरते.

(२) व (३) सदर योजनेचे निकष शासन निर्णय दि. २७ मार्च, २०१५ व ४ नोव्हेंबर, २०१६ मध्ये नमूद करण्यात आले आहेत.

सदर योजना महावितरण व महाऊर्जा यांच्या समन्वयाने राबविण्यात येत असून, या योजनेच्या देखरेखीसाठी दि. २७ मार्च, २०१५ च्या शासन निर्णयामध्ये प्रधान सचिव, ऊर्जा यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची स्थापना करण्याचे नमूद आहे. प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली सौर कृषी पंप आस्थापित करण्यासंदर्भातील प्रगतीचा आढावा, वेळोवेळी घेण्यात येतो.

पेण को.ऑप.अर्बन बँक लि. (जि.रायगड) या बॅकेतील ठेवीदारांचे पैसे मिळवण्यासाठी विशेष कृती समिती स्थापन केल्याबाबत

(२२) १०२१६७ (०६-०१-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण को.ऑप.अर्बन बँक लि. (जि.रायगड) या बॅकेतील ठेवीदारांचे पैसे मिळवण्यासाठी न्यायालयाच्या निर्णयानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली पेण बँक तपास विशेष कृती समिती स्थापन करण्यात आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीने या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१४-०८-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

पेण अर्बन बँकेच्या ठेवीदार संघर्ष समितीने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ येथे दाखल केलेली याचिका क्र. ३६४४/२०११ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार बँकेच्या कर्जवसूलीचे संनियंत्रण व अनुषंगिक कामकाज करण्यासाठी दिनांक १६.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी, रायगड यांचे अध्यक्षतेखाली विशेष कृती समिती स्थापन करण्यात आली आहे.

(२) व (३) सदर विशेष कृती समितीमार्फत उपरोक्त शासन निर्णायमध्ये नमूद मार्गदर्शक सूचनांनुसार कर्जवसूलीचे संनियंत्रण व अनुषंगिक कामकाज करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत राज्य शासनाने मागासवर्ग आयोग स्थापन केला असल्याबाबत

(२३) १०४९२३ (२५-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय कदम (दापोली), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.वारीस पठाण (भायखळा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत राज्य शासनाने मागासवर्ग आयोग स्थापन केला आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, सदर आयोगाचे अध्यक्ष व सदस्य कोण आहेत, तसेच मागासवर्ग प्रवर्ग आयोगाकडे प्रलंबित असलेल्या मराठा आरक्षणाच्या मुद्यावर अद्यापपर्यंत कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) मराठा समाजातील व्यक्तिंना, विद्यार्थ्यांना व नोकरदारांना कोणत्या सवलती देण्याचे मान्य करण्यात आले आहे व त्यानुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. राजकुमार बडोले (१३-०८-२०१८) : (१) होय.

(२) सद्यस्थितीतील सदर आयोगाचे अध्यक्ष, तज्ञ सदस्य व सदस्यांचे नावाचा व पदनामाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

१. मा.श्री.एम.जी.गायकवाड (मा.उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधिश) - अध्यक्ष
२. मा.डॉ.सर्जेराव भाऊराव निमसे - तज्ञ सदस्य
३. मा.प्रा.चंद्रशेखर भगवंतराव देशपांडे - सदस्य
४. मा.डॉ.राजाभाऊ करपे - सदस्य
५. मा.डॉ.भूषण वसंतराव कर्डिले - सदस्य
६. मा.डॉ.दत्तात्रय दगडू बाळसराफ - सदस्य
७. मा.डॉ.सुवर्णा तुकाराम रावळ - सदस्य
८. मा.डॉ.प्रमोद गोविंदराव येवले - सदस्य
९. मा.श्री.सुधीर देवमनराव ठाकरे - सदस्य
१०. मा.श्री.रोहिदास विठ्ठल जाधव - सदस्य

मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणाबाबत सर्व दस्तऐवज तपासून स्वयंस्पष्ट अहवाल शासनास लवकरात लवकर सादर करण्याबाबत शासनपत्र दि.३०/०६/२०१७ अन्वये राज्य मागासवर्ग आयोगास कळविण्यात आले आहे. मराठा आरक्षणासंदर्भात कामकाज राज्य मागासवर्ग आयोगाकडून करण्यात येत आहे. याबाबत राज्य मागासवर्ग आयोगाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) मराठा आरक्षण प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे. तथापि, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती" व "डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" सुरु केलेल्या आहेत. तसेच कौशल्य विकास व उद्योजकता विभागातर्फे १) वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना, २) गट कर्ज व्याज परतावा योजना व ३) गट प्रकल्प कर्ज योजना या तीन नवीन योजना राबविण्यास शासन निर्णय दि.२१.११.२०१७ अन्वये शासन मान्यता दिलेली आहे.

पुणे जिल्ह्यातील जात वैधता प्रमाणपत्र देणाऱ्या समितीकडून एकाच कुटूंबातील व्यक्तींना वेगवेगळे जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आल्याबाबत

(२४) १०५६३८ (०४-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर),

श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील जात वैधता प्रमाणपत्र देणाऱ्या आदिवासी विभागातील जातपडताळणी समितीकडून एकाच कुटूंबातील व्यक्तींना वेगवेगळे जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या जात वैधता प्रमाणपत्र समितीवरील अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२०-०८-२०१८) : (१), (२) व (३) नाही, परंतु एका अर्जदाराने समितीकडे सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये दाव्याच्या पृष्ट्यार्थ नातेवाईकांच्या वैधता प्रमाणपत्राच्या प्रती जोडलेल्या होत्या त्यातील काही नोंदी या मराठा, हिंदू मराठा अशा असल्याचे निदर्शनास आले असल्याने अर्जदाराचा दावा अवैध ठरविण्यात आला असून त्याच्या नातेवाईकांच्या नव्याने प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे फेरनिर्णय का करु नये अशा आशयाची कारणे दाखवा नोटीस निर्गमित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र सावकारी कायद्यातील कलम १८ (२) चा गैरवापर होत असल्याबाबत

(२५) १०६९०६ (२३-०४-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ च्या कायद्यातील कलम १८ (२) मधील तरतुदीचा फायदा घेऊन अवैध सावकार पिडितांवर खोटे गुन्हे दाखल करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, महाराष्ट्र सावकारी अधिनियम, २०१४ कायद्यातील कलम १८ (२) मधील तरतुदी मोघम स्वरुपात असल्याने अवैध सावकार त्याचा गैरफायदा घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर अधिनियमातील कायद्यामध्ये सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच पिडितांवर खोटे गुन्हे दाखल केल्याप्रकरणी अवैध सावकारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२०-०८-२०१८) : (१) नाही. हे खरे नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाच्या विविध योजनांव्दारे मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी योजनांची अंमलबजावणी करणेबाबत

(२६) ११००६५ (२३-०४-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध योजनांव्दारे मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी अनुदान व वित्त सहाय्य यात समन्वय साधून अनुदान देण्याचे शासनाचे धोरण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्हयात प्रशासनाने व बँक व्यवस्थापनाने या योजनांची अंमलबजावणी योग्य रीतीने केली नसून योजनेसाठी पात्र असलेल्या मागासवर्गीयांना योजनेचा लाभ देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने या योजनांची अंमलबजावणी योग्य रीतीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२७-०७-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्हा सहकारी बँकेच्या निर्मितीबाबत

(२७) ११०३९३ (२३-०४-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकार आयुक्त व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग यांचे कार्यालयाने पालघर जिल्हा सहकारी बँकेच्या निर्मितीबाबत दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक विभाजनाबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसर अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (११-०७-२०१८) : (१) होय.
(२) ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ सभा दिनांक २८/०२/२०१७ मधील ठराव क्र. २४ अन्वये ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्ह्याची निर्मीती झाली असली तरी बँकेच्या विभाजनासंबंधी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ठाणे व पालघर जिल्ह्यातील भागधारक संस्थेच्या एकाही पदाधिकाऱ्याने बँक विभाजनाचा ठराव मांडलेला नाही. त्यामुळे तूर्त ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभाजन करण्याबाबतची कार्यवाही झालेली नाही. बँकेचे विभाजन झाले नसले तरी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १०५ शाखांपैकी पालघर जिल्ह्यात बँकेच्या ४० शाखा कार्यरत असल्याने जनतेस ठाणे येथे जाण्याची आवश्यकता नाही. सहकार कायद्यातील तरतूदीनुसार बँकेच्या विभाजनाबाबत बँकेच्या जनरल बॉडीने ठराव संमत करून निबंधकास व भारतीय रिझर्व्ह बँकेला प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे. असा प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याबाबत निबंधकाच्या स्तरावर निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जरंडी (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथील शेतकऱ्याने सावकारी कर्जाच्या नैराश्यामुळे आत्महत्या केल्याबाबत

(२८) ११०७८६ (१९-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जरंडी (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथील एका अल्पभूधारक शेतकऱ्याने सावकारी कर्जाच्या नैराश्यामुळे विषारी औषध सेवन करुन आत्महत्या केली असल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आत्महत्याग्रस्त शेतकरी यांच्या कुटूंबाला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१४-०८-२०१८) : (१) नाही.
सदर शेतक-याच्या आत्महत्येचे कारण सावकारी कर्ज नसल्याचे तहसिलदार, सोयगांव, जि.औरंगाबाद यांच्या अहवालावरुन दिसून येते.
(२) आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटूंबास आत्महत्याग्रस्त शेतक-यांसाठी असलेल्या आर्थिक मदतीसाठी पात्र ठरविले असून त्यांना प्रत्येकी रु.१.०० लाख सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आलेले असून सदर रक्कम त्यांच्या वारसास अदा केलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शिष्यवृती गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत

(२९) ११०८७२ (२०-०४-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिष्यवृत्ती गैरव्यवहारप्रकरणी अनेक ठिकाणी तपास सुरू असला तरी गैरव्यवहाराचे मूळ असलेल्या वर्धा जिल्हयात मात्र मागील ६ वर्षांपासून अद्यापपर्यंत तपास सुरु करण्यात आला नसल्याने वर्धा जिल्हयातील एकाही संस्थेवर कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा जिल्हयातील ११८ एमएसबीटीईच्या संस्थापैकी केवळ दोनच संस्था यावर्षी सुरू असून उर्वरित ११६ संस्थेचे कामकाज अचानक बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे

(४) असल्यास, चौकशी अंती संबधितावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२०-०८-२०१८) : (१) नाही.

(२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक ८.१२.२०१५ अन्वये वर्धा जिल्हयातील महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित एकूण १८ संस्थाची शासन मान्यता रद्द केलेली आहे. त्यापैकी २ शैक्षणिक संस्थांना ठराविक कालावधीकरीता महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता प्रदान केलेली आहे.

(३) व (४) भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण फी परीक्षा फी प्रतिपूर्ती योजनेच्या अनुषंगाने विशेष चौकशी पथकाने केलेल्या चौकशीवरील अहवालाची पडताळणी करण्याची कार्यवाही आयुक्त, समाजकल्याण यांचेस्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जात प्रमाणपत्रांची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

(३०) ११०९५१ (२०-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्यातील १५ पेक्षा अधिक जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे सुमारे ५० हजारांपेक्षा जास्त प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मागासप्रवर्गासाठी निर्धारित केलेल्या सर्व प्रकाराचा लाभ घेण्यासाठी जात पडताळणी आवश्यक असल्यामुळे हजारो प्रकरणे संबंधित जिल्हा समित्यांकडे दाखल झालेली असून यामध्ये विद्यार्थी, शासकीय कर्मचारी व विजयी लोकप्रतिनिधी यांची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्याचे निर्देश असतांनाही त्याची अंमलबजावणी होत नसल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जात प्रमाणपत्र पडताळणी यांच्या गैरकारभारामुळे सर्वसामान्य जनतेला आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने सदर जातपडताळणी प्रमाणपत्रे तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच संबंधित गैरकारभारामधील दोषी अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (३०-०७-२०१८) : (१) नाही.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, सोलापूर या समितीकडे डिसेंबर, २०१७ अखेर एकूण ५८२३ इतकी प्रकरणे प्रलंबित होती.

(२) नाही.

समितीकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावावर दुसऱ्या दिवसापासून कार्यवाही करण्यात येते, त्रुटी पूर्ततेबाबत संबंधित अर्जदारास एसएमएस व लेखी पत्राद्वारे कळविण्यात येते. जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करतांना प्रकरणपरत्वे प्राप्त कागदपत्रे, पुरावे, आवश्यकतेनुसार पोलीस दक्षता पथकाकडून अहवाल घेऊन विहित तरतुदीनुसार संबधित जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडून उचित निर्णय घेतले जातात.

(३) नाही.

जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कामकाज हे सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३ तसेच त्या अंतर्गत तयार करण्यात आलेले नियम, २०१२ मधील तरतुदीनुसार तसेच मा.उच्च व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार चालते. सदर नियमानुसार जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता आवश्यक ते जातीचे पुरावे, कागदपत्रे देण्यात आल्यास, सदर प्रमाणपत्र प्राप्त होण्यास कोणतीही अडचण उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील यंत्रमाग उद्योजकांच्या विविध मागण्यांबाबत

(३१) १११६७० (२०-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमाग उद्योगास विविध अडचणी असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर यंत्रमाग उद्योग वाचविण्याकरिता राज्यातील यंत्रमाग उद्योजकांनी आपल्या विविध मागण्यांसंदर्भात शासनास वारंवार निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यंत्रमाग उद्योग संपुष्टात आल्यास त्यावर उपजीविका करणारे छोटे-मोठे उद्योग (कामगार, हातगाडीवाले, चहा टपरीवाले, हमाल, छोटे हॉटेल व्यावसायिक, पान टपरीवाले, खानावळ) हे उद्योगही बंद पडणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यंत्रमाग उद्योगाला अडचणींतून बाहेर काढण्याकरिता अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०३-०८-२०१८) : (१) नाही.
(२) होय.
(३) नाही.
(४) राज्यातील साध्या यंत्रमागधारकांना यंत्रमागाकरिता त्यांनी घेतलेल्या कर्जावरील व्याजात ५ टक्के सवलत अनुदान देणेबाबतचा निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. तसेच २७ एच. पी. पेक्षा कमी दाबाच्या व २७ एच. पी पेक्षा जास्त दाबाच्या यंत्रमागधारकांच्या वीज दरात असलेली विसंगती दुर करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याबाबत व २०० एच.पी. पेक्षा अधिक दाबाच्या यंत्रमागांना रु.२/- प्रति युनिट वीज दर सवलत देण्याबाबतचा निर्णय तसेच यंत्रमागाकरिता केंद्र शासन राबवित असलेल्या ग्रुप वर्क शेड योजना, यार्न बँक योजना, सामायिक सुविधा योजना व सौर ऊर्जा योजना या योजनांना राज्य शासनाच्या पुरक योजना सुरु करण्याचा निर्णय दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आलेल्या वस्त्रोद्योग धोरणात घेण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

धारणी तालुक्यातील (जि.अमरावती) अनुदानित खाजगी संस्थांच्या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांकरीता आवश्यक असलेल्या भौतिक सुविधा देण्याबाबत

(३२) १११८४६ (१८-०४-२०१८). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकात्मिक आदिवासी विकास विभागाद्वारे सुरू असलेल्या धारणी तालुक्यातील (जि.अमरावती) अनुदानित खाजगी संस्थांच्या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांकरीता आवश्यक असलेल्या भौतिक सुविधा प्राप्त न झाल्याने विद्यार्थी व विद्यार्थीनींची गैरसोय होत असल्याचे प्रकार माहे डिसेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, त्यानुसार विद्यार्थ्यांना तातडीने भौतिक सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०२-०७-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रकल्प अधिकारी, धारणी यांनी धारणी प्रकल्पांतर्गत असलेल्या अनुदानित आश्रमशाळांना दिलेल्या भेटीत काही आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना शासनाच्या धोरणाप्रमाणे भौतिक सुविधा पुरविल्या जात नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. भेटीदरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याकरिता संबंधित आश्रमशाळांना नोटीसा बजावण्यात आल्या असून आश्रमशाळांकडून त्रुटींची पुर्तता करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

या अनुषंगाने अनुदानित आश्रमशाळा गोडवाडी ता.धारणी जि.अमरावती या शाळेची मान्यता रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव जिल्ह्यातील शासकीय आदिवासी मुलांसाठी असलेल्या वसतीगृहातील गैरसोईंबाबत

(३३) १११८८९ (२३-०४-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील खेडी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसर, सिंधी कॉलनी, शिव कॉलनी, सिध्दार्थनगर येथील शासकीय आदिवासी मुलांसाठी असलेली वसतीगृहे भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतीगृहाची दुरवस्था झालेली असून ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग, विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या गाद्या व सतरंज्या जीर्ण झालेल्या असून छत व नळ गळके आहेत तसेच स्वच्छता गृहांना दरवाजे नसल्याने विद्यार्थ्यांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासकीय वसतीगृहाच्या अधिकाऱ्यांकडे विद्यार्थ्यांनी तक्रारी केल्या आहेत, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१३-०८-२०१८) : (१) जळगाव जिल्हयातील कार्यरत ४ शासकीय वसतीगृहांपैकी २५० क्षमतेचे मुलींचे तसेच मुलांच्या ५०० क्षमतेपैकी २५० विद्यार्थ्यांसाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसरात बांधकाम झालेल्या शासकीय इमारतीमध्ये व्यवस्था करण्यात आलेली आहे. उर्वरीत दोन वसतीगृहांचे बांधकामे प्रगतीपथावर असून सध्या हे वसतीगृहे भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.
(३) वसतिगृहांच्या दुरावस्थेसंबंधी तक्रारी प्राप्त नाहीत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

पंडित दिनदयाल उपाध्याय स्वंय योजनेंतर्गत भोजन व निवासासाठी तालुकास्तरावर विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

(३४) १११८९९ (०४-०४-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यापासून वंचित राहिलेल्या आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थीनींना गेल्या वर्षापासून जिल्हास्तरावर पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयं योजनेंतर्गत भोजन व निवासासाठी रोख आर्थिक मदत देण्याची योजनेची सुरुवात करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंडित दिनदयाल उपाध्याय स्वंय योजनेंतर्गत भोजन व निवासासाठी तालुकास्तरावर विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळावी अशी मागणी चोपडा येथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे पत्राव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. विष्णु सवरा (०२-०७-२०१८) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

भोजापूर (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील ६५ शेतक-यांना कर्जमाफी योजनेचा लाभ देण्याबाबत

(३५) ११२४३८ (२१-०४-२०१८). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोजापूर (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील अन्नपूर्णा उपसा जलसिंचन सहकारी संस्था मर्यादित या संस्थेकरीता ६५ शेतकऱ्यांनी त्यांची ४६० एकर शेतजमीन भू-विकास बँकेकडे गहाण ठेवली असून सदर योजना कार्यान्वित न झाल्याने शेतकऱ्यांना योजनेचा फायदा झालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ७/१२ वर कर्जाची नोंद असल्याने त्यांना कोणत्याही बँकेतून कर्ज मिळत नाही त्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संस्थेला कर्जमाफी योजनेचा लाभ मिळाला नसल्याने शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील कर्ज पुर्णपणे वगळण्यात येईल काय व त्यास किती कालावधी लागण्याची शक्यता आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१४-०८-२०१८) : (१) व (२) होय.
(३) सदर संस्थेच्या सभासद शेतकऱ्यांवरील थकीत कर्ज माफ करण्याच्या अनुषंगाने सद्य:स्थितीत शासन स्तरावरुन कोणतीही कार्यवाही सुरु नाही.

तथापि, संस्थेच्या २२ सभासद शेतकऱ्यांनी भुविकास बँकेसाठीच्या एक रकमी कर्ज परतफेड योजनेंतर्गत एकूण रु. ५४.२३ लाख (व्याजासह) इतक्या रक्कमेच्या कर्जाची परतफेड केली असून संबंधीतांच्या एकूण १२७ एकर जमीनीवरील कर्जाचा बोजा कमी करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ वृध्दापकाळ योजनेच्या वार्षिक उत्पन्नाच्या अटीमध्ये वाढ करणेबाबत

(३६) ११२७७५ (२३-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ वृध्दापकाळ योजना लागू करण्यासाठी दारिद्रय रेषेखालील वगळता इतरांना रु.२१,००० (रुपये एकवीस हजार) वार्षिक उत्पन्नाची मर्यादा आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यामध्ये बऱ्याच ठिकाणी तलाठी सदरहू रु.२१,००० वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र देण्यास दुर्लक्ष करीत असल्याने अनेक लाभार्थ्यांना योजनेपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२६-०७-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत बाजार समितीमध्ये गोदाम उभारण्यासाठी मंजूरी मिळण्याबाबत

(३७) ११३०४४ (२०-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत बाजार समितीमध्ये गोदाम उभारण्यासाठी २५ टक्के अनुदानावर निधी देण्यास शासनाने मंजूरी दिली असून त्या निधीमधून पाच बाजार समित्यांमध्ये गोदामे उभी राहणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही बाजार समित्यांमध्ये अदयापी गोदामेच नसल्याने शेतकऱ्यांना शेतमाल तारण ठेवण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी गोदामे उभी राहण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०२-०८-२०१८) : (१), (२) व (३) राज्यात एकुण १०८ बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी १००० मे.टन क्षमतेची नवीन गोदामांची उभारणी महाराष्ट्र कृषि पणन मंडळामार्फत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत केंद्र शासनाच्या Agriculture Marketing Infrastructure, Sub Scheme of ISAM च्या Cost Norms प्रमाणे प्रति मे.टन रु ८७५/-याप्रमाणे एकुण रुपये ९.४५ कोटी इतक्या अनुदानास केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे. त्यानुसार बांधकामाच्या एकुण खर्चाच्या ९ टक्के इतके अनुदान महाराष्ट्र कृषि पणन मंडळास प्राप्त होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चिखलदरा (जि.अमरावती) या आदिवासी तालुक्यातील विद्यार्थ्यांकरिता "पंडीत दिनदयाल" योजना लागु करण्यासंदर्भात

(३८) ११३२०९ (०४-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखलदरा (जि.अमरावती) या आदिवासी तालुक्यातील विद्यार्थ्यांकरिता "पंडीत दिनदयाल" योजना लागू करण्यासंदर्भात लोकप्रतिनीधी यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.आदिवासी विकास मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०२-०७-२०१८) : (१) हे खरे आहे.
(२) पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अमळनेर (जि.जळगांव) तालुक्यातील प्रताप मिल मधील कामगारांना घरे मिळण्याबाबत

(३९) ११३२३३ (२७-०४-२०१८). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगांव) तालुक्यातील प्रताप मिल मधील कामगारांना घरे मिळावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०१ मार्च, २०१६ व दिनांक ०७ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.सहकार मंत्री यांच्याकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त प्रकरणी मा.सहकार मंत्री यांनी संबंधितांना कार्यवाहीचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी संबंधित विभागामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (३१-०७-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रताप मिल, अमळनेर येथील जीन चाळ व मिल चाळ या नावाने ओळखल्या जाणा-या चाळी भाडेतत्वावरील जागेवर प्रताप मिलने बांधलेल्या आहेत. शासन निर्णयानुसार रहिवाश्यांच्या ताब्यातील २२५ चौ.फू. जागा विनामूल्य देऊन रहिवाश्यांचे ताब्यातील २२५ चौ.फू. पेक्षा जास्तीच्या जागेचे मूल्य रहिवाश्यांनी अदा करावयाचे आहे. परंतु यानुषंगाने रहिवाशी व जमीन मालक यांच्यामध्ये सहमती होत नसल्यामुळे रहिवाश्यांना चाळींचे हस्तांतरण प्रलंबित आहे. जीन चाळीच्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालय , औरंगाबाद खडपीठ येथे रहिवाश्यांनी तसेच महामंडळाने याचिका दाखल केलेली असून प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेले प्रोत्साहन अनुदान प्राप्त न झाल्याबाबत

(४०) ११३३८३ (१९-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेले प्रोत्साहन अनुदान प्राप्त न झाल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान म्हणून १५ ते २५ हजार रुपये जाहीर केलेले असले तरी अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान न देण्यामागची कारणे कोणती आहेत,
(४) असल्यास, नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान तात्काळ देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०६-०८-२०१८) : (१) व (२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) शासन निर्णय, दिनांक २८/०६/२०१७ अन्वये सन २०१५-१६ मध्ये अल्पमुदत पिक कर्जाची उचल करून मुदतीत कर्जाची संपूर्ण परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी शासनाने प्रोत्साहनपर अनुदान जाहीर केले आहे. सदर योजनेंतर्गत दिनांक १३/०६/२०१८ अखेर पर्यंत १५,३८,२४३ खातेदारांना रूपये २४५० कोटी प्रोत्साहनपर लाभापोटी देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

किरवली (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील ठाकूरवाडी आणि सावरगांव ठाकूरवाडी या दोन आदिवासी वाड्यांमध्ये सुविधा नसल्याबाबत

(४१) ११३८२७ (१८-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किरवली (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील ठाकूरवाडी आणि सावरगांव ठाकूरवाडी या दोन आदिवासी वाड्यांमध्ये पक्का रस्ता नसणे, नळपाणी योजना नसणे, तसेच शासकीय योजनांपासून आदिवासी समाज वंचित असणे इ. गैरसोयी असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार या आदिवासी वाड्यांना उक्त सुविधा देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०४-०८-२०१८) : (१) खरे आहे.
(२) व (३) किरवली गाव ते ठाकुरवाडी व सावरगाव ठाकूरवाडी हे अंतर ३.७० कि.मी. आहे. सदर अंतरासाठीच्या रस्त्याच्या कामासाठी लागणा-या जागेचे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सर्वेक्षण झालेले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत होणार आहे.

सदर वाड्यांमध्ये पाणी पुरवठ्यासाठी प्रत्येकी एक विहीर आहे. मात्र सदर वाड्या उंच डोंगरमाथ्यावर वसलेल्या असल्याने तेथे उन्हाळ्यात पाणी टंचाई निर्माण होते. या कालावधीत

ग्रामपंचातीमार्फत पाणी पुरवठा करण्यात येतो. उक्त वाड्यांसाठी ग्रामपंचायतीने नळपाणी पुरवठा योजनेची मागणी केल्यास त्याबाबत रायगड जिल्हा परीषदेकडून कार्यवाही करता येईल
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील वस्त्रोद्योगाला चालना देण्याबाबत

(४२) ११४०२८ (२०-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १३२ गिरण्या असून वस्त्रोद्योगाचा मुख्य घटक असलेल्या सुतगिरण्यांना अधिक सक्षम करण्यासाठी शासन सुतगिरण्यांना कमी दराने वीज उपलब्ध करून देणार असल्याने दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास राज्यात सुतगिरण्या, यंत्रमागधारक याप्रमाणे राज्यातील अनेक ठिकाणी हातमागाचा व्यवसायही सुरु असून सोलापूर हे हातमाग उद्योगाचे मोठे केंद्र आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, हातमागावरील तयार होणारे कापड हे टिकाऊ व उत्तम दर्जाचे असते, राज्यातील अनेक हातमाग व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर असून हातमाग विणकर सहकारी संस्था डबघाईला आल्या असून हातमागावर काम करणाऱ्या कामगारांची उपासमार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२७-०७-२०१८) : (१) होय. हे खरे आहे.

राज्यात १३२ सहकारी सूतगिरण्यांना शासकीय अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, दिनांक १५ फेब्रुवारी २०१८ अन्वये राज्याचे नवीन वस्त्रोद्योग धोरण २०१८-२०२३ जाहीर करण्यात आले असून सदर वस्त्रोद्योग धोरणात राज्यातील सहकारी सूतगिरण्यांना वीज दरात प्रति युनिट रु. ३/- प्रमाणे सवलत जाहीर करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे,

हातमागावर काम करणाऱ्या कामगारांची उपासमार होत असल्याबाबतची कोणतीही तक्रार वा सदर बाबत अर्ज प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, सोलापूर यांचे कार्यालयास किंवा वस्त्रोद्योग संचालनालयास तसेच शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन नियम, २०१२ मध्ये त्रुटी असल्याबाबत

(४३) ११४३११ (२३-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन नियम, २०१२ मध्ये त्रुटी असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्जदाराचे खापर पंजोबा/पंजोबा/आजोबा/वडील यांचा शाळा सोडल्याचा दाखला तसेच यांचा जन्म नोंदीचा उतारा/गाव नमुना नं.१४ (तहसिल रेकॉर्ड विहीत नमुन्यातील) सादर करावा, तसेच नातेसंबध सिध्द करणेसाठी जाती पुरावे सादर केलेल्या रक्तनात्यापैकी यांची वारसनोंद, शाळा प्रवेश जनरल रजिस्टर उतारा (मुख्याध्यापकांच्या प्रतिज्ञापत्रासह) व मुळ मोडी नोंदीचे सत्यप्रत यासह सादर करावे इत्यादी अटी असल्यामुळे विदयार्थ्यांना, नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने विद्यार्थ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२६-०७-२०१८) : (१) नाही.

शासन निर्णय दि.०१/०४/२०१६ अन्वये मा.मंत्री (सा.न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती सुलभ करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरिता १२ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे.

(२) नाही.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३ व त्यांतर्गत पारित केलेले महाराष्ट अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन नियम, २०१२ मधील नियम क्र.४ सक्षम प्राधिकाऱ्याकडून जातीचे प्रमाणपत्र मिळविण्याबाबतची कार्यपद्धती अन्वये जन्म नोंदवहीतील उतारा, प्राथमिक शाळा प्रवेश नोंदवहीतील उतारा, प्राथमिक शाळा सोडल्याचा दाखला,रहिवासाचा लेखी पुरावा, सेवा अभिलेख उतरा, असल्यास वडिलांकडील रक्तनाते संबंधातील वैधता प्रमाणपत्र, महसुली अभिलेख किंवा ग्रामपंचायत अभिलेख इत्यादी कागदपत्रे सादर करावीत अशी तरतूद आहे, त्यानुसार कार्यवाही केली जाते.

(३) तसेच अधिक सुलभतेने जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी उपरोक्त नियमांमध्ये आणखी सुलभीकरण करण्याचे शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यात कर्जमाफी योजनेतून सुमारे ७५ हजार शेतकरी वंचित असल्याबाबत

(४४) ११४७७५ (२३-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि प्रोत्साहन अनुदानाच्या ४ यादया प्रसिध्द झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पात्र-अपात्रतेबाबतची प्रक्रिया अजुनही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या कर्जमाफीतील योजनेमधील जाचक अटींमुळे सुमारे ७५ हजार शेतकरी कर्जमाफीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर्जमाफीच्या पात्र-अपात्रतेच्या प्रलंबित याद्यांना मंजूरी देऊन शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याबाबत तसेच या योजनेपासून वंचित असलेल्यासुमारे ७५ हजार शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या कक्षेत आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२६-०७-२०१८) : (१) होय, हे अंशत: खरे आहे. शासनाकडून ७ ग्रीन लिस्ट प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

(२), (३) व (४) राज्यातील थकीत कृषी कर्जमाफीबाबत शासन निर्णय, दि. २८.६.२०१७ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना - २०१७ जाहीर करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत अधिकाधिक शेतकऱ्यांना फायदा मिळण्यासाठी सदर शासन निर्णयात वेळोवेळी बदल करण्यात आलेला आहे. त्यानुसार योजनेच्या पात्रतेचे निकषही नमूद करण्यात आले आहेत. शासन निर्णय, दिनांक ०९.०५.२०१८ अन्वये सदर योजनेची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे.

सांगली जिल्ह्यात एकूण १३३५१९ सभासदांच्या ७ ग्रीन लिस्ट प्राप्त झाल्या असून त्यांची तपासणी करून त्यामधील १११३२१ पात्र खातेदारांच्या खाती रक्कम रू. २५१.५१९ कोटी वर्ग करून त्यांची खाती निरंक करण्यात आली आहेत. ७०३७ खातेदार एकरक्कमी परतफेड योजनेस पात्र असून रू. १.५० लाखाच्या वरील रक्कम भरण्यासाठी दि. ३०.६.२०१८ पर्यंत मुदत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला (जि.अकोला) तालुक्यातील समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त कार्यालयात महिला कर्मचाऱ्याचा छळ होत असल्याबाबत

(४५) ११५०४१ (१९-०४-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) तालुक्यातील समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांचा छळ होत असल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोपी कर्मचारी महिला कर्मचाऱ्यांसमोर कार्यालयीन वेळेत मसाज करून घेऊन अश्लील हावभाव करत असल्याची तक्रार महिला कर्मचाऱ्यांनी केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्यालयातील वरिष्ठ लिपिकास दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास सिटी कोतवाली पोलिसांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कार्यालयामध्ये महिला कर्मचाऱ्यांचा छळ होत असून सुद्धा सहाय्यक आयुक्त यांनी याबाबत सतत दुर्लक्ष करून आरोपीला सूट दिली असा कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा आरोप आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (३०-०७-२०१८) : (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) व (५) अंशत: खरे आहे.

याबाबत सहाय्यक आयुक्त व पोलीस प्रशासन यांचे अहवालावरुन आयुक्तालयाचे आदेश क्र. १९१४, दि. १३ जून, २०१८ अन्वये संबंधित श्री. एन.ए.खंडारे, वरिष्ठ लिपीक, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, अकोला यांना निलंबीत केले आहे.

सटाणा (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कांदा खरेदीच्या व्यवहारातील व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना दिलेले धनादेशाची रक्कम खात्यात जमा न झाल्याबाबत

(४६) ११५२९५ (२३-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सटाणा (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कांदा खरेदीच्या व्यवहारातील व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना दिलेली ८० लाख रुपयांच्या धनादेशाची रक्कम जमा झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धनादेशाची रक्कम जमा न झाल्याने व्यापाऱ्यांनी कांदा खरेदीचे १ कोटी २० लाख रुपये शेतकऱ्यांना देण्याचे आदेश सटाणा येथील न्यायालयाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (०२-०८-२०१८) : (१) व (२) नाही, मात्र सटाणा येथील कांदा विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याने साधारण साधारणत: १० ते १२ वर्षापुर्वी रत्नागिरी येथील कांदा खरेदीदार व्यापाऱ्याविरुध्द मा.दिवाणी न्यायालय, सटाणा, ता.बाणलाण, जि.नाशिक येथील न्यायालयात दावा दाखल केला होता.सदर दाव्याचा निकाल जानेवारी,२०१८ वा त्या दरम्यान होऊन रत्नागिरी येथील कादा खरेदीदार व्यापाऱ्यांने सटाणा येथील कांदा विक्री व्यापाऱ्यास रुपये १ कोटी २० लाख इतक्या दंडासह देण्याचे आदेश मा.न्यायालयाने दिले आहेत.

(३) सदर व्यवहार सटाणा बाजार समितीच्या आवारात अथवा शेतकरी आणि व्यापारी यांच्यामध्ये झालेला नसून कांदा विक्री करणारा व्यापारी व कांदा खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये झालेला आहे. सदर व्यवहार बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात झालेला असला तरी सदर व्यवहारात शेतकरी व बाजार समितीचा संबध नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी शंभर रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर हमी पत्र लिहून दयावे लागत असल्याबाबत

(४७) ११५४७९ (१९-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती देण्यासाठी शंभर रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर हमी पत्र लिहून दयावे लागत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरुवातीला ऑनलाईन अर्जासाठी व आताच्या हमीपत्रासाठी विद्यार्थ्यांकडून विनाकारण रक्कम वसूल केली जात असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (३१-०७-२०१८) : (१) अंशत: होय,

(२), (३) व (४) वि.जा.भ.ज., इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या बॅन्क खात्यावर जमा होणारी फी ची रक्कम त्याने सात दिवसांत महाविद्यालयास अदा करण्याच्या दृष्टीने विद्यार्थी व पालकांकडुन १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर हमी पत्र घेण्याच्या सूचना वि.जा.भ.ज., इमाव व विमाप्र कल्याण विभागाने दिनांक ९.१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या होत्या. मात्र, त्याऐवजी साध्या कागदावर विद्यार्थी व पालकांचे हमीपत्र घेण्याबाबत त्या विभागाने दिनांक २६.२.२०१८ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये सूचना दिलेल्या आहेत.

तर आयुक्त, समाजकल्याण पुणे यांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडुन साध्या कागदावर हमी पत्र घेण्याच्या सूचना दिलेल्या असल्याने विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक वा आर्थिक नुकसान झालेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील यंत्रमाग क्लस्टर योजनेच्या प्राथमिक संकल्पना अहवालास मान्यता देण्यात आल्याबाबत

(४८) ११५५२२ (१९-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमाग क्लस्टर योजनेच्या प्राथमिक संकल्पना अहवालास मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालानूसार आवश्यक मंजूरी आणि कागदोपत्री कामकाज पुर्ण करण्यात येऊन यंत्रमाग उदयोगाच्या कस्टरसाठी जमिनीची निश्चित करावी, अशा सूचना मा.जिल्हाधिकारी यांनी दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (३०-०७-२०१८) : (१) नाही.

तथापि, सोलापूर यंत्रमाग क्लस्टर योजनेच्या प्राथमिक संकल्पना अहवालास (DCR (Detailed Conceptual Report)) दुसऱ्या क्लस्टर कोऑर्डिनेशन ग्रुप (CCG) च्या दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या सभेमध्ये शिफारस करुन विभागीय वस्रोद्योग आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडे केंद्र शासनाची मान्यता मिळण्याकरिता पाठविण्यात आलेले आहे. क्लस्टर कोऑर्डिनेशन ग्रुपने शिफारस करुन पाठविलेल्या DCR ला केंद्र शासनाकडून मान्यता मिळालेली नाही.

(२) व (३) होय.

केंद्र शासनाकडून प्राथमिक संकल्पना अहवालास मान्यता मिळाल्यानंतर व Special Purpose Vehicle (SPV) ला मान्यता मिळाल्यानंतर सदर सोलापूर क्लस्टरकरिता जमिनीची निश्चिती करण्यात येणार आहे.

तथापि, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ च्या क्लस्टर कोऑर्डिनेशन ग्रुपच्या सभेमध्ये क्लस्टरची उभारणी लवकर व विहित कालावधीत करण्याकरिता जमिनीची पाहणी करुन निश्चिती करणे, पाण्याची उपलब्धता पाहणे व इतर महत्वाच्या आवश्यक सुविधा उपलब्ध करुन घेणेबाबत क्लस्टरमधील भागधारकांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

रुपी बँकेने गत पाच वर्षापासून ठेवीदारांच्या रकमेचा परतावा न केल्याबाबत

(४९) ११५६१० (१९-०४-२०१८). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गत पाच वर्षापासून दिवाळखोरीत निघालेल्या रुपी बँकेने ठेवीदाराने ठेवीच्या स्वरूपात गुंतवणूक केलेल्या रक्कमेचा आजपर्यंत कोणताही परतावा दिला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (१४-०८-२०१८) : (१) नाही.

(२) व (३) रिझर्व्ह बँकेने त्यांच्या दिनांक ०२.०७.२०१५ रोजीच्या आदेशान्वये हार्डशीप मधील ठेवींचे मंजूरीचे अधिकार बँकेच्या प्रशासकीय मंडळास दिले आहेत. तद्नंतर बँकेच्या ५,२०,९९३ ठेवीदारांपैकी ७४,१२२ ठेवीदारांना रु.२९४.४९ कोटी इतक्या रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे. तसेच रु. ५०००/- पर्यंत ठेवी असणाऱ्या ४९५५ ठेवीदारांना रु.१.२९ कोटी इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याबाबत

(५०) ११५९३० (०४-०४-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागातर्फे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना लागू केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरजू व पात्र विद्यार्थ्यांना डावलल्याचे व इतर विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तसेच अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०२-०८-२०१८) : (१) नाही, तथापि अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सन २००३ पासून परदेश शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. सन २०१० पासून ५० पात्र विद्यार्थ्यांना सदरहू योजनेंतर्गत शिष्यवृत्तीचा लाभ दिला जातो.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०१७-१८ या वर्षामध्ये एकूण ४५ पात्र विद्यार्थ्यांची निवड केली असून त्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.